स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**REGISTRAR OFFICE**

Phone : 02462-229300
Fax : 02462-229574
Website: www.srtmun.ac.in
E-mail: beudsrtmun@gmail.com

## ::परिपत्रक::

मा. सर्व संचालक शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर व प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ यांना सदर परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या शासन पत्र क्र. संकिर्ण–२०१५/प्र. क्र. १३४/१५/आस्था–२, दि. ११/०८/२०१५ या पत्राव्दारे खालीलप्रमाणे मुददे कळविले आहेत:

१. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) कायदा १९९५ ची कडक अंमलबजावणी करावी
२. सर्व शासकीय कार्यालयामध्ये अपंगाकरिता तसेच जेष्ठ नागरिक, गरोदर स्त्रियांकरिता Ramp Bar, Toilet, Bathroom व इतर सुविधा तातडीने उपलब्धकरण्यात याव्यात.
३. अपंग कर्मचा–यांना वाहने/उपकरणे उपलब्ध करुन देणे.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये अपंग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बाबतीत उपरोक्त मुद्दा बाबत योग्य ती कार्यवाही करावी व महाविद्यालयामध्ये अपंगाना अत्यावश्यक असणा–या सुविधा प्रदान करण्यात याव्यात. अपंग कर्मचा–याना प्रवास सुलभ करण्यासाठी शासन तरतुदीनुसार वाहने/उपकरणे उपलब्ध करुन देण्यात यावीत, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा, भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

तरी सदर परीपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाहीचा करण्यात यावी व कार्यअहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा.

''ज्ञान तीर्थ'' परीसर )(
विष्णुपुरी, नांदेड )(
जा. क्र.शैक्षणिक–३/२०१५–२०१६/९८०४ )(
दिनांक :१०/१२/२०१५ )(
)(

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहीतीस्तव :

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
२. मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक उच्च शिक्षण,शिक्षण संचालनालय, पुणे.
४. मा. सह संचालक उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड.
५. सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना विद्यापीठ वेबसाईटवर उपलब्ध करण्यासाठी.

आ. क्र. 3272 दिनांक 27/10/15
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

महाराष्ट्र शासन

# कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक,

## (उच्च शिक्षण),नांदेड विभाग, नांदेड

(शासकीय तंत्रनिकेतन परिसर, नांदेड-४३१६०२, फोन/फॅक्स ०२४६२-२५३१४४). ईमेल पत्ता: jdhe.nanded@yahoo.co.in

जा.क्र. विशिससं/उशि/नांवि/२०१५-१६/अनु-२/ 7366-67 दि.21/10/२०१५

कार्यालयाच्या संकेतस्थळावरुन / ईमेलद्वारे/परिपत्रक /

प्रति,
सर्व प्राचार्य
शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

विषय :- **अपंगाच्या विकासासाठी राज्यातील राज्यशासन तसेच महाराष्ट्र प्रशासनाकडून अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत विनंती.**

संदर्भ :- १. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१३४/१५/आस्था-२, दि. ११/०८/२०१५
२. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०१५/अपंग/मवि-४/९७९३ दि. ०६/१०/२०१५

वरील विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की,संदर्भिय शासन पत्र व अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र अपंग संचलित टेलिफोन बुथ संघटना, मुंबई यांचे दि. ०७.०८.२०१४ रोजीचे मा. मुख्यमंत्री महोदयांना दिलेले निवेदन सोबत जोडले आहे. सदर निवेदनामध्ये खालील मुद्दे दिलेले आहेत.

१. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) कायदा १९९५ ची कडक अंमलबजावणी करावी.
२. सर्व शासकीय कार्यालयामध्ये अपंगाकरिता तसेच जेष्ठ नागरिक, गरोदर स्त्रियांकरिता Ramp Bar, Toilet, Bathroom व इतर सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात याव्यात.
३. अपंग कर्मचाऱ्यांना वाहने /उपकरणे उपलब्ध करुन देणे.

तरी आपल्या महविद्यालयामध्ये अपंग शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बाबतीत उपरोक्त मुद्दा बाबत योग्य ती कार्यवाही करावी व महाविद्यालयामध्ये अपंगांना अत्यावश्यक असणाऱ्या सुविधा प्रदान करण्यात याव्यात. अपंग कर्मचाऱ्यांना प्रवास सुलभ करण्यासाठी शासन तरतुदीनुसार वाहने/उपकरणे उपलब्ध करुन देण्यात यावीत, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा,भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबावदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.एम.एन. खताळ)
सहसंचालक
उच्च शिक्षण, नांदेड विभाग,
नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर : -**

१) मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण ), शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे-१. यांना माहितीस्तव सादर.
२) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या अशासकीय कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

Est 1BCUD
P.K.